अर्थसंकल्प वितरण प्रणालीमधून प्रत्यक्ष निधी वितरित केल्यानंतर
अखर्चित राहिलेला निधी खर्च करण्यास परवानगी देणेबाबत

**महाराष्ट्र शासन**

**वित्त विभाग**

परिपत्रक क्रमांक :अविप्र १०.०८/प्र.क्र.१४/अर्थसंकल्प-४,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : १४ जानेवारी, २००९

संदर्भ: १. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र :अविप्र १०.०८/प्र.क्र.१४/अर्थसंकल्प-४, दि.२८ एप्रिल २००८

**परिपत्रक**

संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये सन २००८-०९ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्प वितरण प्रणालीसंदर्भात आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार २००८-०९ या आर्थिक वर्षासाठी उपलब्ध झालेले अनुदान तसेच पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध झालेले अनुदान वित्त विभागाकडून प्रशासकीय विभागांना तसेच प्रशासकीय विभागांकडून त्यांचे अधिनस्त नियंत्रक अधिका-यांना व त्यांचेमार्फत आहरण व संवितरण अधिका-यांना अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर वितरित करण्यात आलेले आहे.

२. सदर परिपत्रकातील परि.क्र.४ अन्वये अर्थसंकल्प वितरण प्रणालीमार्फत प्रशासकीय विभागांना उपलब्ध झालेला निधी ,मंजूर मासिक निधी विवरणपत्रानुसार खर्च करणे अनिवार्य करण्यात आलेले असून उपलब्ध झालेला निधी मासिक निधी विवरणपत्रानुसार खर्च न झाल्यास असा अखर्चित राहिलेला निधी विभागांना डिसेंबर, २००८ पर्यंत पुढे ओढून (Carry Forward) घेण्यास मान्यता देण्यात आली होती.

३. ३१ डिसेंबर, २००८ नंतर अद्यापही काही विभागांचा निधी अखर्चित राहिल्याचे शासनाच्या निदर्शनास आल्याने सदरचा अखर्चित निधी विभागांना उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. उपरोक्तप्रमाणे जो निधी दिनांक ३१ डिसेंबर, २००८ अखेरपर्यंत खर्च होऊ शकलेला नाही, असा अखर्चित राहिलेला निधी अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर **फेब्रुवारी, २००९ पर्यंत** पुढे ओढून घेण्यास (Carry Forward) शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सु.प्र.कानडे)
सहसचिव, वित्त विभाग

प्रति,
राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्र्यांचे व उपमुख्यमंत्र्यांचे सचिव
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सचिव
सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
प्रशासकीय विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व कार्यालयप्रमुख
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
महालेखापाल (वाणिज्यिक लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
* सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई
*प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.
*प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
*प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई.
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य वित्त व लेखा अधिकारी
संचालक लेखा व कोषागारे, मुंबई.
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
उप संचालक, लेखा व कोषागारे, पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती, औरंगाबाद, कोकण भवन, नवी मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
सर्व कोषागार अधिकारी
सर्व उप कोषागार अधिकारी
जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवडनस्ती, वित्त विभाग, अर्थसंकल्प-१